नविन सेवार्थ प्रणाली अंमलबजावणीबाबत...

सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी सेवार्थ प्रणालीतील सद्य:स्थितीतील उपलब्ध विदा (Data) नवीन सेवार्थ प्रणालीत अद्ययावत करणेबाबतच्या सूचना

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४
दालन क्रमांक ३३७, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १७ ऑक्टोबर, २०२३

प्रस्तावना -

सद्य:स्थितीत सुरु असलेली सेवार्थ प्रणाली ही सन २०१२-२०१३ पासून कार्यान्वित आहे. सदर प्रणाली विकसित होऊन बराच कालावधी झाल्याने तसेच वापरकर्त्याकडून होणारा प्रणालीचा वापर पाहता, सदर प्रणाली सुरळीतपणे सुरु राहण्यासाठी त्यामध्ये काही ठराविक पातळीपर्यंतच विकसन करणे भाग पडते. त्यामुळे सध्या कार्यान्वित असलेल्या प्रणालीचे नवीन प्रणालीत रुपांतर करणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. वित्त विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार आता राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे (NIC) यांचेमार्फत नवीन सवार्थ प्रणाली विकसन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक :-

सध्या कार्यान्वित असलेल्या सेवार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध असणारी संपूर्ण विदा (Data) ही अंतिम पडताळणी करुनच नवीन विकसित होणाऱ्या प्रणालीमध्ये समाविष्ट करावयाची असल्याने आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना प्रत्येक टप्प्यावर सदर विदा (Data) पडताळणी करावी लागणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून सध्या कार्यरत असलेल्या सेवार्थ प्रणालीतील कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करण्यासाठी सहाय्यकाच्या लॉगीनमध्ये (DDO Asst) नवीन स्क्रीन विकसित करण्यात आलेली आहे. सदर स्क्रीनमार्फत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून संबंधित कर्मचाऱ्याच्या माहितीसह सध्या सदर कर्मचारी कोणत्या अचूक पदनामानुसार सदर कार्यालयात कार्यरत आहे, याबाबतचा तपशील तसेच त्याची सेवार्थ प्रणालीत अन्य उपलब्ध असलेली माहिती पडताळणीसाठी प्राप्त होणार आहे. सदर तपशील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने पडताळणी करावयाचा असून, अंतिम पडताळणी अंतीच अशी विदा (Data) नवीन सेवार्थ प्रणालीत समाविष्ट करण्यात येणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दत अनुसरावयाची आहे.

कर्मचारी विषयक विदा (Data) पडताळणीसह पदनाम सुधारणा करणे :-

संबंधित प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सेवार्थ प्रणालीतील भरण्यात आलेल्या पदांच्या पदनामात सुधारीत आकृतीबंधानुसार बदल झालेला असेल तर प्रथमत: असा बदल सध्या सुरु असलेल्या प्रणालीत करुन घ्यावा. त्याचप्रमाणे नवीन पदनामानुसार जर पदनाम दिसून येत नसेल, तर प्रथमत: सदर पदनाम Add करण्यासाठी आपल्याशी संबंधित प्रशासकीय विभागाशी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संपर्क साधावा व सदर पद Add करुन घ्यावे. नवीन सेवार्थ प्रणालीत सदर बदलानुसार

कर्मचारी विषयक विदा (Data) अंतर्भूत करणेसाठी सहाय्यकाच्या लॉगीनमध्ये Utility for Incorrect Data Cleaning (Current Path : Work list > Payroll > Utility for Incorrect Data Cleaning) ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

Sr. No.	Employee Name	Sevaarth ID	Date of Birth	Date of Joining	Date of Retirement	Group	Super _Age	Desig nation	Post	Date of Birth	Date of Retirement	Group	Retirement Age	Desig nation	Remark

सदर सुविधेनुसार संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सध्या प्रणालीमध्ये उपलब्ध असलेली विदा (Data) दिसून येईल. सदर तपशीलामध्ये अनुक्रमे

१. कर्मचाऱ्याचे नाव
२. सेवार्थ आयडी
३. जन्म तारीख
४. सेवानिवृत्ती दिनांक
५. ग्रुप (A, B, Bngz, C, D)
६. सेवानिवृत्तीचे त्या पदाचे वय
७. सध्याचे पद
८. पदाचा तपशील, इत्यादी तपशील दिलेला आहे.

उपरोक्त दिलेल्या माहितीमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी सर्वात डाव्या बाजूला कर्मचाऱ्याच्या नावाशेजारी एक चेक बॉक्स दिलेला आहे. त्या चेकबॉक्सवर क्लिक केल्यानंतर वापरकर्त्याने सध्या असलेले सुधारीत पदनाम सिलेक्ट करावयाचे आहे. सुधारीत पदनाम सिलेक्ट केल्यानंतर प्रणालीमध्ये आपोआप पदनामानुसार सेवानिवृत्तीचे वय, त्या कर्मचाऱ्याच्या जन्मतारखेनुसार त्याचा सेवानिवृती दिनांक व त्याचा अचूक ग्रुप दिसून येईल. त्यानंतर रिमार्कमध्ये त्यानुसार चार पर्याय दिलेले आहेत त्या पर्यायास सिलेक्ट करुन असा तपशील जतन (Save) करण्यात यावा.

सदर माहिती जतन (Save) करण्यापूर्वी दर्शविण्यात आलेल्या माहितीमध्ये कर्मचाऱ्यांचे नाव अचूक असल्याची खात्री करावी व जर नावामध्ये बदल करावयाचा झाल्यास सहाय्यकाच्या लॉगीनमधून Worklist-->Payroll-->Changes other details--> Personal Details याप्रमाणे मार्गक्रमण करुन प्रथम अचूक माहिती सहाय्यकाच्या लॉगीनमधे भरुन अशी माहिती Worklist-->Payroll-->Draft of Changes-->Select Designation-->Verify करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या लॉगीनमध्ये अग्रेषित (Forward) करण्यात यावी व त्यांच्या लॉगीनमधून सदर माहितीस मान्यता (Approval) देण्यात यावी. अशा प्रकारे संबंधित कर्मचाऱ्याचे नाव अद्ययावत करण्यात यावे. जन्मतारीख, नेमणुकीचा दिनांक, सेवानिवृत्ती दिनांक यामध्ये दुरुस्ती करावयाची झाल्यास त्यासाठी सेवापुस्तकाच्या अचूक पानाच्या स्कॅन प्रतीसह mdc.sevaarth@mahakosh.in या ईमेलवर कळविण्यात यावे. सदर तपशील दुरुस्त करुन झाल्यावर त्या संबंधित कर्मचाऱ्याची प्रणालीतील माहिती जतन (Save) करावी. त्याकरिता दिलेल्या विहीत कालावधीमध्ये दुरुस्ती करुन घेण्याची जबाबदारी ही सर्वस्वी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची राहील. दिलेल्या अवधीमध्ये दुरुस्ती करुन घेण्यात आली नाही, तर पुढील अवधीमध्ये सदर दुरुस्ती प्रस्तावित केल्यास अशी दुरुस्ती करण्यात येणार नाही याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

सदर प्रणालीत जतन (Save) केल्यानंतर त्या कर्मचाऱ्याची माहिती सहाय्यकाच्या लॉगीनमध्येच Report-->Employee Sorted Data Report (Current Path : Reports--> Payroll--> Employee Sorted Data Report) मध्ये दिसून येईल. सदर माहितीमध्ये त्या कर्मचाऱ्याची त्याच्याशी संबंधित असलेली सेवार्थ प्रणालीतील सर्व माहिती सुध्दा जतन (Save) झाल्याचे दिसुन येईल. सदर सर्व तपशील अचूक असल्याबाबत खात्री करावी. सदर तपशीलात जर काही बदल करावयाचा झाल्यास, प्रणालीत उपलब्ध असलेल्या सुविधेनुसार बदल करुन घ्यावा अथवा सदर बदल करणे शक्य नसल्यास, कोषागारात उपलब्ध असलेल्या IT Office Assistant (Support Staff) कडे संपर्क साधावा.

उपरोक्त माहिती सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी **दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३** पूर्वी अद्ययावत करावी तसेच **माहे नोव्हेंबर, २०२३ देय डिसेंबर, २०२३** ची वेतन देयके सादर करताना या परिपत्रकासोबत देण्यात आलेले प्रमाणपत्र आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने वेतन देयकासोबत सादर करण्यात यावे. सदर कार्यवाही पूर्ण केली नसल्यास **माहे नोव्हेंबर, २०२३ देय डिसेंबर, २०२३** ची वेतन देयके पारित होणार नाहीत, याची सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

सर्व कोषागार अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवार्थ (TO Login) लॉगीनमध्ये त्यांच्या अधिनस्त असलेल्या किती आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी उपरोक्त माहिती अद्ययावत केली, याबाबतचा अहवाल (Report) पाहण्याराठी सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तरी सदर प्रमाणे तपासणी करुनच वेतन देयके पारित करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२३१०१७१०५८३३८३०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca0b8ff6f25ff78cfc9e6d815fef95bb367b07, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=17A42E18:ACE4C129ABBEB54E2783ED32D40156063BF644A5478672054 7=CES, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2023.10.17 11:03:01 +05'30'

(डॉ.राजेंद्र गाडेकर)
शासनाचे उप सचिव

प्रति,

सर्व आहरण व संवितरण अधिकारी, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,

प्रत-

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.मुंबई.
२. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
३. मा. राज्यपाल यांचे सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
६. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
८. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभाग/कार्यालयांचे प्रमुख
९. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई

११. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१५. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१९. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२१. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२२. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. सर्व जिल्हाधिकारी
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२७. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३०. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३२. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३३. निवड नस्ती/कोषा प्रशा-४.

प्र मा ण प त्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ अन्वये सूचित केल्यानुसार आहरण व संवितरण अधिकारी सांकेतांक क्रमांक ..... च्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांची माहिती सेवार्थ प्रणालीमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या सुवेधेमध्ये अद्ययावंत करण्यात आलेली आहे.

सही/-
आहरण व संवितरण अधिकारी
कार्यालय
शिक्का